सकाळ



गडहिंग्लज : डॉ. शिंदे कॉलेज व रोबोटिक्समध्ये करार झाला. यावेळी डॉ. डी. व्ही. घेवडे, डॉ. विरेश मठद, महादेव बंदी, किरण पवार, प्रणव लाड आदी उपस्थित होते.

# शिंदे कॉलेज-रोबोटिक्समध्ये करार

गडहिंग्लज : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी पुणे येथील आय रोबोटिक्स कंपनीला प्रत्यक्ष भेट देऊन सामंजस्य करार केला. रोबोटिक्स व ऑटोमेशन रोबोटिक्स लॅब विकास तसेच प्लेसमेंट विभागाच्या विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत कंपनीने करार केला. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विरेश मठद, विभागप्रमुख प्रा. महादेव बंदी यांच्या टीम पथकाने करार केला. आय रोबोटिक्सचे व्यवस्थापकीय संचालक किरण पवार, रिसर्च प्रमुख प्रणव लाड उपस्थित होते. पवार यांनी संस्थेस सर्वतोपरी मदतीची ग्वाही दिली. तज्ज्ञांची व्याख्याने, तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यास भेट, संसाधनाची देवाण घेवाण, प्रायोजित प्रकल्प असे उपक्रम राबविले जातील. लाड यांनीही मार्गदर्शन केले. सचिव प्रा. स्वाती कोरी यांनी विद्यार्थ्यांना अद्ययावत कौशल्य व ज्ञान देणे काळाची गरज असल्याचे सांगितले. संस्थाध्यक्षा उर्मिला शिंदे, सल्लागार महेश कोरी यांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार पूर्णत्वास आला.

# डॉ. शिंदे कॉलेज आणि आय रोबोटिक्समध्ये सामंजस्य करार

**गडहिंग्लज :** भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयाने पुणे येथील आय रोबोटिक्स या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. हा करार रोबोटिक्स आणि ऑटोमेशन क्षेत्रातील कौशल्य विकास, रोबोटिक्स लॅबचा विकास आणि प्लेसमेंट विभागाच्या विविध उपक्रमांच्या नियोजनासाठी करण्यात आले आहे. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीन ॲकडमिक्स डॉ. विरेश मठद, प्रा. महादेव बंदी यांच्या टीमने पुणे येथील आय रोबोटिक्स कंपनीला प्रत्यक्ष भेट देऊन कंपनीच्या कार्याचा अभ्यास केला आणि हा करार निश्चित केला. आय रोबोटिक्सचे रिसर्च आणि डेव्हलोपमेंट प्रमुख प्रणव लाड यांनी मार्गदर्शन केले. किरण पवार यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या सचिव प्रा. स्वाती कोरी यांनी या प्रकारच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अद्ययावत कौशल्ये आणि ज्ञान देणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. संस्था अध्यक्षा उर्मिला शिंदे, सल्लागार महेश कोरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार पूर्णत्वास आला.